आपण हा लेख www.maanavta.com या अध्यात्मिक वेबसाईट वर वाचत आहात.

संपादकीय

प्रथमता इहलोक तर सुखी होवो ____

लेखक – श्री. राम कुमार 'सेवक' जी मुख्य संपादक – www.maanavta.com

निरंकारी बाबा गुरबचन सिंहजी सांगायचे की पती–पत्नी संसाराच्या गाडीचे दोन चाके आहेत, त्याच्यात बसलेले प्रवासी आहेत मुले. सगळयांमध्ये पूर्ण ताळमेळ असला तर संसाराची गाडी योग्यरित्या चालते.

गाडीच्या विचाराने लक्षात आले की, गाडीचे समोरा–समोरील दोन्ही चाकांचे बरोबर असणे आवश्यक आहे. बरोबर चा अर्थ काय आहे, या विषयी विचारमंथन केल्यावर लक्षात येते की, बरोबरचा अर्थ हा नव्हे की दोघांचा रंग गोरा पाहीजे, किंवा दोघांची लांबी–रूंदी सारखी पाहीजे अथवा दोघांचे वजन सारखेच पाहीजे, त्याव्यतिरिक्त दोघांच्या विचारात समानता पाहीजे, दोघे जर एकाच दिशेत विचार करत असतील तर हे अती उत्तम आहे, परंतु जर एकाच दिशेत विचार करीत नसाल, अर्थात जर एक घरास मोठे करण्याविषयी विचार करतोय आणि दुसरा व्यवसायात वृध्दी करण्याविषयी विचार करतोय, तेव्हा सुध्दा काही वावगे नाही, कारण शेवटी दोघांचे ध्येय तर एकच आहे अर्थात सुख प्राप्त करणे. या ठिकाणी आम्हाला लक्षात येते की, बरोबरीचा अर्थ आहे, ध्येयाची समानता. याच्याही पुढे जो अर्थ प्रतीत होतो तो हा की, एक दुसऱ्याच्या प्रती सन्मान.

मला वाटते की, 'परलोक' तर सुखकारक (आनंदी) व्हावयास हवा परंतू त्या अगोदर या लोकाच (जीवन) सुखी होने आवश्यक आहे, कारण हा 'लोक' आमचा वर्तमान आहे तर 'परलोक' आमचे भविष्य आहे. जर हा इहलोकच (लोक) सुखी नसेल तर जीवनापरांत (परलोक) आनंद मिळणे कसे शक्य आहे.

काही वर्षा अगोदर निरंकारी प्रदर्शनीतं एक फलक प्रदर्शित केला जात होता ज्यात निरंकारी राजमाताजी द्वारा सांगितली गेलेली तीन बाबी लिहलेली होती,

१. ज्या घरात आई दुखी असते त्या घरातून आजारपण जात नाही.

२. ज्या घरात मुलगी दुखी असते त्या घरातून क्लेश जात नाही.

३. ज्या घरात सुन दुखी असते त्या घरातून दारिद्रयता जात नाही.

या तिन्ही बाबीचा संबध इहलोक सुखी होण्याशी आहे. इहलोकाचे सुखी होण्यात पती–पत्नी दोघांची आपली भुमिका असते. आपल्या भुमिकेला योग्य न्याय देण्याकरिता आवश्यकता आहे की, दोघे एक दुसऱ्यांच्या प्रती विरोधाची भावना न बाळगता एक दुसऱ्या प्रती सहकार्याची भावना बाळगावी. सहकार्याची भावनाच शेवटी यशापर्यंत पोहचवते.

दोन चाकांच्यामध्ये अंतर असणे हे निश्चित आहे, एक कारखान्यात काम करतोय, दुसरा स्वयंपाक घरात या कुणा दुसऱ्या कार्यालयात. हे अंतर तर आहे. कारण चाकांच्या

दरम्यानसुध्दा अंतर तर असतेच, नाहीतर गाडीचे पुढे चालणे ही कठीण होऊन बसेल. पती–पत्नींच्या दरम्यान ही अंतर आवश्यक आहे, जितके की स्वयंपाक घरात आणि दिवाणखान्याच्या दरम्यान असते. ते योग्य अंतर आहे, त्याच्यात कुठेही उच्चता या निम्नतेचा भाव नाही आहे.

दोघांमधील अंतराच्या व्यतिरिक्त समानतेचा अर्थ हा आहे की, एक–दुसऱ्याची एक दुसऱ्यात पूर्ण निष्टा (विश्वास) असणे.

निरंकारी विवाहात ज्या ओवी वाचल्या जातात, त्याच्यात सुध्दा सांगितले गेलय –

इक–दुजे दा, इक – दुजे से इक जेहा अधिकार है ।

सत्यता तर ही आहे की,

एक नुर है सबके अन्दर नर है चाहे नारी है।

ब्राम्हण, खत्री, वैश्य, हरीजन एक की रचना सारी है (अवतार वाणी)

स्त्री–पुरूष दोघांचे शरीरही पाच तत्वांपासुन निर्मित आहे, त्याकरीता या आधारानुसार परमात्मानेच समानता बनवलेली आहे. या शरीराला गतीमान ठेवणारा आत्मासुध्दा एकच आहे, तर उच्च–निच्चतेच्या भावनेची शक्यताच समाप्त होऊन जाते.

पती–पत्नीत कितीही मतभेद जरी असले आणि त्यांच्यात कितीही भिन्नता जरी असल्या तरी ते एकमेकांस सलग्न आहेत. दोघांकरीता दोघांची आवश्यकता आहे त्याकरीता भारतीय संस्कृतीत विवाह एक अत्यावश्यक संस्कार आहे, इथपर्यंत की, ऋषी–मुनींनीसुध्दा या संस्काराचा सन्मान केला आहे. महर्षि वशिष्ट, महर्षि अत्री इत्यादी महान संतसुध्दा या गृहस्थीच्या गाडीत बसले आणि त्यास त्यांच्या सर्वोच्चतेच्या शिखराकडे नेले.

हिंदु विवाह सोहळयात जी सप्तपदीची प्रथा आहे त्यात म्हटले गेले आहे की,

ऊँ सप्तमे सागराश्चैव सप्तद्वीपाः सपवर्ताः।

येषा सप्तषिर्ततनीना तेषामादशर्साक्षिण ।

याच्यात एकमेकाप्रती मित्रता आणि सहकार्याच्या भावनेचा सन्मान अधोरेखित केला आहे, हे ऐकमेकाप्रती मित्रता कायम करावया तथा वाढवण्याकरीता आहे, येथे मित्रता शब्द सम्मीलीत केला गेला आहे.

जर सखोल विचार केला तर, जाणवते मित्रत्वाचे नाते, रक्ताच्या नात्यापेक्षा जास्त जवळचे असते. रक्त संबधांना नाते म्हणतात आणी नातेसंबध तर घेण्या–देण्याच्या आधारावर चालतात. येथे Give & Take चे तत्व काम करते परंतू मित्रत्वाच्या नात्यात अश्या काही औपचारिकतेची आवश्यकता नसते. मित्र तेव्हा ही मित्रच असतो, जेव्हा एक मित्र खुप कठीण परिस्थितीतून जात असतो. खरा मित्र नेहमी धाडस वाढवतो, मैत्रीच्या सत्यतेचा निर्णय (जाणिव) सुध्दा याच अवस्थेत होतो.

पती–पत्नीच्या संबधात बऱ्याच वेळा मित्रतेची कल्पनाच केली जात नाही, पण खरे तर पती–पत्नीच खरे मित्र असु शकतात. मी तर म्हणेल की, कमीत–कमी एक मत तरी

निश्चित व्हावयास हवे जे माझ्या बाजुने असेण आणि आमचे मत त्याच्या बाजुला असने निश्चित असेल.

महाभारतात यक्षाने युधिष्टीरांना विचारले की, घरात मित्र कोण आहे? युधिष्टीर सांगतात की, पत्नीच घरात मित्र असते.

या मित्रतेची अथांगता बघा–वनवासाला जाण्याचा आदेश रामजीं करीता होता, पण सीताजीसुध्दा त्यांच्या सोबत निघाली कारण प्रेम वरचढ होते. जनककन्या तथा राजा दशरथांची सुन सीताजी ने वनवासाच्या वेळी किती–किती कष्ट सहन नाही केले, खरे बघ ायला गेले तर तो आदेश त्यांच्याकरीता नव्हताच, ही प्रेमाची परम्मोचता आहे.

हेच प्रेम विवाहरूपी संस्थेचा आत्मा आहे. आता प्रश्न येतो विवाह अथवा संसाररूपी गाडीतील प्रवाशांचा, प्रवाशी आहे – मुले. मुले ऐकमेकांशी प्रेमाने वागले तरच गाडी योग्य चालेल. जर प्रवाशांनी आप–आपसात भांडायला सुरूवात केली, तरी चालकाला गाडी योग्य रितीने चालवता येणार नाही.

बाबा हरदेव सिंहजी महाराजांनी एकदा आपल्या प्रवचनात सांगितले की, एका नावीकाच्या नावेत प्रवाशी आनंदात गीत गात होते, नावीकसुध्दा आनंदात नाव चालवीत होता, थोडयाच वेळात प्रवाशांमध्ये काहीतरी तंटा सुरू झाला. हळु–हळु भांडण वाढायला लागले, हात–घाईची वेळ येऊन गेली. नाव डगमगायला लागली, आता मात्र नावीक, प्रवाशींना बोलायला लागला की, जर आनंदाचे गीत गाऊ शकत नाही तर कमीत–कमी आपआपसांत भांडण तरी करू नका कारण भांडणामुळे नावेचा वेग कायम राहु शकत नाही.

नावेतील प्रवाश्यांच्या सारखे मुलांनी आप–आपसांत प्रेमाने राहणे खुपच आवश्यक आहे. पती–पत्नीने मिळुन अशी व्यवस्था निर्माण केली पाहीजे की, मुलामध्ये ऐकमेकांत कधीच संघर्ष होऊ नये. त्यांच्यात पूर्ण ताळमेळ हवा, हे तर खुपच चांगले आहे, परंतु जर असे झाले नाही तर त्यांच्यात विवाद तरी होऊ नये.

वरील संदर्भाने हे स्पष्ट होते की, बाबजींचे वरील वचन की, पती–पत्नी संसाराच्या गाडीचे दोन चाकांसारखे आहेत हे खुपच अर्थपूर्ण आहे. प्रत्येक मानवाला या बाबींवर लक्ष द्य ाव लागेल तथा या गोष्टींना स्विकारून गृहस्थी जीवन सुध्दा सुखमय बनवले पाहीजे , त्याचवेळी इहलोक सुखी होऊ शकेल..... परलोक सुखी होणे तर नंतरची बाब आहे प्रथमत: इहलोक तर सुखी व्हावा.

राम कुमार 'सेवक'
rksewak@yahoo.co.in

अनुवादक
सुकदेव पाटील
sukdeo_behere@yahoo.co.in